**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांकः28.10.2025** **वारःमंगळवार**

---

**ठळक बातम्या**

- **नवी दिल्लीत आयोजित आंतरराष्ट्रीय सौर संघटनेच्या ८व्या संमेलनाला राष्ट्रपती दौपदी मुर्मू आज संबोधित करणार**
- **इंडिया मेरीटाईम वीक परिषदेमध्ये जागतिक उद्योगांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी पंतप्रधान उद्या संवाद साधणार**
- **महाराष्ट्रासह चार राज्यांतील डाळी आणि तेलबियांच्या, १५ हजार कोटींपेक्षा जास्त खर्चाच्या खरेदी योजनेला केंद्राची मंजुरी**
- **बिहारसह देशभरांत छटपुजेचा उत्साह**
- **आणि**
- **मोथा चक्तिवादळाच्या पार्श्वभूमीवर आंध्रप्रदेशात अतिदक्षतेचा इशारा**

आता सविस्तर बातम्या

**<u>राष्ट्रपती</u>**

राष्ट्रपती दौपदी मुर्मू आज नवी दिल्लीत आंतरराष्ट्रीय सौर संघटनेच्या ८ व्या संमेलनाला अर्थात ISA ला संबोधित करणार आहेत. तसंच या कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्राला नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी संबोधित

करतील.पुढील चार दिवस या संमेलनाचं आयोजन करण्यात आलं असून जागतिक स्तरावरील १२४ देशातील विविध विभागांचे प्रतिनिधी आणि ४० हून अधिक देशांचे मंत्री उपस्थित राहणार आहेत. सौर उर्जा क्षेत्रात जागतिक समुदायातील सहकार्य वाढवण्यासाठी तसंच उज्ज्वल आणि शाश्वत भविष्यासाठी सौरऊर्जाचा वापराला गती देण्यासाठी तसंच सर्वांना परवडणाऱ्या दरांत सौरउर्जा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने उपाययोजना करण्यासंदर्भात चर्चा होणार आहेत.

**पंतप्रधान**

मुंबईमध्ये सुरु असलेल्या इंडिया मेरीटाईम वीक परिषदेला पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या संबोधित करणार आहेत. यावर्षीच्या इंडिया मेरिटाईम परिषदेत जागतिक स्तरावरील नील अर्थव्यवस्थेत काम करणाऱ्या उद्योगांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी बैठकीच्या अध्यक्षपदावरुन ते उपस्थितांशी संवाद साधतील.
सागरी अमृत काल व्हिजन २०४७ या पंतप्रधानांच्या संकल्पनेला चालना देण्याच्या उद्देशाने महत्त्वाकांक्षी, भविष्याभिमुख सागरी परिवर्तनासाठीची वचनबद्धता दर्शवणारा हा उपक्रम आहे. यामध्ये जलवाहतूक, बंदरे, जहाजबांधणी, क्रूझ पर्यटन आणि नील अर्थव्यवस्थेतील आघाडीच्या भागधारकांना एकत्रित आणण्यासाठीचं हे व्यासपीठ आहे. या कार्यक्रमात ८५ हून अधिक देशांचा सहभाग असेल, ज्यामध्ये एक लाखाहून अधिक प्रतिनिधी आणि ३५० हून अधिक आंतरराष्ट्रीय वक्ते सहभागी होणार आहे.

**अमितशहा**

मुंबई हे भारताच्या सागरी क्षेत्रातील महत्त्वाचं स्थान असून ‘इंडिया मेरीटाईम वीक-२०२५’च्या निमित्ताने, भारत नवीन सागरी इतिहास घडवण्यासाठी सज्ज असल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी केलं. शहा यांच्या हस्ते काल मुंबईत भारत सागरी सप्ताह या परिषदेचं उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. नील अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी केंद्र सरकार अनेक

धोरणात्मक निर्णय घेत आहे, असं सांगून, शहा यांनी जगभरातील गुंतवणुकदारांना भारतात गुंतवणूक करण्याचं आवाहन केलं. इंडिया मेरीटाईम वीक हा भारताच्या सागरी प्रवासातला एक महत्त्वाचा टप्पा असल्याचं केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी सांगितलं. तसंच धोरणात्मक सुधारणा, डिजिटलायझेशन आणि क्षमता विस्ताराद्वारे २०४७ पर्यंत जागतिक व्यापारातला आपला वाटा तिप्पट करण्याचं भारताचं उद्दिष्टाचा पुनरुच्चार केला त्यांनी केला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि  अजित पवार, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

वाढवण बंदरामुळे भविष्यात महाराष्ट्राबरोबरच भारत सागरी शक्तीच्या रूपात उदयाला येईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी बोलताना म्हणाले.

या पाच दिवसांच्या कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी महाराष्ट्राच्या बंदर विभागानं सागरी व्यापार क्षेत्रात ५६ हजार कोटी रुपयांचे १५ सामंजस्य करार केल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी वार्ताहरांशी बोलताना दिली. ऊर्जेवर चालणाऱ्या जहाजांची बांधणी, जलवाहतूक इत्यादी क्षेत्रातल्या सामंजस्य करारांचा समावेश असल्याचं ते म्हणाले.

दरम्यान मुंबईत माझगाव गोदीत खोल समुद्रात मासेमारी करण्यासाठीच्या दोन नौकांचं लोकार्पणही शहा यांच्या हस्ते काल झालं. या नौकांची चावी आणि नोंदणी प्रमाणपत्रही यावेळी लाभार्थ्यांना वितरित करण्यात आली.

**<u>डाळखरेदी</u>**

केंद्र सरकारने २०२५-२६च्या खरीप हंगामामध्ये महाराष्ट्र, तेलंगण, ओडिशा आणि मध्य प्रदेश या चार राज्यांतील डाळी आणि तेलबियांच्या, १५ हजार कोटींपेक्षा जास्त खर्चाच्या खरेदी योजनेला मंजुरी दिली आहे. या अंतर्गत महाराष्ट्रातील सोयाबीनची १८ लाख ५० हजार ७०० मेट्रिक टन, उडदाची ३ लाख २५ हजार ६८० मेट्रिक टन आणि मूगाची ३३ हजार मेट्रिक टन खरेदी केली जाणार आहे. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल ही घोषणा केली.

प्रधानमंत्री अन्नदाता आय संरक्षण अभियान; म्हणजेच पीएम-आशा अंतर्गत या योजनेला मंजुरी देण्यात आली. या संदर्भात चौहान यांनी काल राज्यांच्या कृषिमंत्र्यांबरोबर दूरस्थ माध्यमातून बैठक घेतली. देशातील शेतकऱ्यांचं उत्पन्न सुरक्षित ठेवण्याला केंद्र सरकारचं सर्वोच्च प्राधान्य आहे, असं शिवराज सिंह चौहान यावेळी म्हणाले.

**<u>पंतप्रधानविकसितभारत</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील तरुणांना विकसित भारत प्रश्नमंजुषा स्पर्धेत सहभागी होण्याचं आवाहन केलं आहे. देशातील तरुणांना राष्ट्र उभारणीत योगदान देण्यासाठी विकसित भारत युवा नेतृत्व संवाद ही एक उत्तम संधी आहे, तरुणांचे विचार आणि त्यांच्या भूमिकेतून विकसित भारताच्या उभारणीचा मार्ग प्रशस्त होईल असं पंतप्रधानांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात

**<u>एस जयशंकर</u>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज आणि न्यूझीलंडचे पंतप्रधान क्रिस्टोफर लक्सन यांच्याशी द्विपक्षीय मुद्यांवर चर्चा केली.  समाजमाध्यमावरील संदेशात त्यांनी ही माहिती दिली आहे. तसंच  डॉ. जयशंकर यांनी जपान, मलेशिया, ब्राझील आणि ब्रुनेई या देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांचीही भेट घेतली आणि प्रादेशिक मुद्द्यांवर चर्चा केली. दरम्यान जागतिक शांतता आणि स्थैर्यासाठी दहशतवाद हा सर्वात मोठा धोका आहे आणि अशा प्रवृत्तींना मुळापासून नष्ट करणे आवश्यक आहे असा पुनरुच्चार जयशंकर यांनी काल केला. मलेशियातील क्वालालंपूर इथं २० व्या पूर्व आशिया शिखर परिषदेला संबोधित करताना ते बोलत होते.

## रशिया

रशिया आणि अमेरिकेतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी अणुऊर्जेवर चालणाऱ्या क्रूझ क्षेपणास्त्र चाचणीची केलेली घोषणा योग्य नसल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी म्हटलं आहे. रशियाने त्यांच्या अणुऊर्जेवर चालणाऱ्या बुरेव्हेस्टनिक क्रूझ क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केल्याचं पुतीन यांनी सांगितलं. जगातल्या इतर कोणत्याही देशाकडे नसलेली ही यंत्रणा लष्करी सेवेत  आणण्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा तयार करण्याची तयारी करण्याचे आदेश त्यांनी रशियाच्या लष्कराला दिले.

## अश्विनी वैष्णव

इलेक्ट्रॉनिक उत्पादनाला चालना देण्याच्या उद्देशाने सुरु असलेल्या  योजनेअंतर्गत देशभरात इलेक्ट्रॉनिक घटक उत्पादन प्रकल्प उभारण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने काल पहिल्या टप्प्याला मंजुरी दिली. असं माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल माध्यामांशी बोलताना दिली. यामध्ये एकंदर पाच हजार ५३२ कोटी रुपयांची गुंतवणूक आणि ३६ हजार ५५९ कोटी रुपयांचे उत्पादन अपेक्षित आहे. या प्रकल्पांमुळे पाच हजारांहून अधिक थेट रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे. तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि मध्य प्रदेशमध्ये नियोजित या प्रकल्पांमुळे देशांतर्गत पुरवठा साखळी मजबूत करेल आणि  मुख्य इलेक्ट्रॉनिक घटकांच्या उत्पादनाला  बळकटी मिळेल. असंही ते म्हणाले.

## एकता दिवस

येत्या शुक्रवारी, 31 ऑक्टोबर ला राष्ट्रीय एकता दिवस संचलन होणार आहे. यामध्ये सीमा सुरक्षा दलाच्या स्वदेशी श्वान पथकाचं k 9 हे एक विशेष पथक सादरीकरण करणार आहे.

**छट पूजा**

सुर्यदेवतेची आराधना करण्याचा, श्रद्धेचा सण म्हणून ओळखला जाणारा छट पूजेचा उत्सव देशाच्या अनेक भागांमध्ये उत्साहानं साजरा केला जात आहे. बिहारमध्ये, गंगा, गंडक, कोसी, महानंदा आणि बागमती यासारख्या नद्यांच्या काठावर तसंच देशभरातील विविध जलाशयातील छठ घाटांवर सूर्यदेवाची प्रार्थना करण्यासाठी भाविक  मोठ्या संख्येनं उपस्थित आहेत. आज अनेक भाविकांनी उगवत्या सूर्याला अर्घ्य देऊन छट महापर्व साजरे केले.

**वादळ**

बंगालच्या उपसागरावर निर्माण झालेल्या मोंथा चक्रीवादळाचं आज तीव्र चक्रीवादळात रूपांतर होण्याची शक्यता आहे. या चक्रीवादळामुळे  आंध्रप्रदेशातील श्रीकाकुलम, विजयनगरम, विशाखापट्टणम, अनकापल्ली, पूर्व गोदावरी, कोनासीमा, काकीनाडा, कृष्णा, नेल्लोर आणि प्रकाशम जिल्ह्यांमध्ये आधीच मुसळधार पाऊस आणि जोरदार वारे वाहत आहेत. ताशी ९०-११० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे, तसेच किनारपट्टी भागात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.शाळा आणि महाविद्यालये बंद ठेवण्यात आली आहेत आणि अत्यावश्यक सेवा वगळता बहुतेक दुकाने बंद ठेवण्यात आली आहेत. अनेक रेल्वे आणि विमान सेवा रद्द करण्यात आल्या आहेत. मच्छिमारांना समुद्रापासून दूर राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी काल परिस्थितीचा आढावा घेतला. ३५ हजारहून अधिक लोकांना मदत छावण्यांमध्ये हलवण्यात आले आहे. एनडीआरएफ, एसडीआरएफ आणि विशेष पथके बचाव कार्यासाठी सज्ज आहेत. आज रात्री मोंथा वादळ आंध्र प्रदेशला धडकण्याची शक्यता आहे. तसंच यानम, लगतच्या दक्षिण ओडिशाचा किनारी भाग आणि छत्तीसगडला उद्यापर्यंत अतिदक्षतेचा इशारा देण्यात आला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला आणि केंद्रीय मदतीचं आश्वासन दिलं. नायडू यांनी सज्जतेचा आढावा घेतला आणि अधिकाऱ्यांना परिस्थितीववर लक्ष देण्याच्या सुचना दिल्या. दक्षिण मध्य पूर्व किनारी रेल्वे आणि विविध विमान सेवा रद्दकरण्यात आल्या आहेत.

**शेवटी पुन्हा ठळक बातम्या**

- **नवी दिल्लीत आयोजित आंतरराष्ट्रीय सौर संघटनेच्या ८व्या संमेलनाला राष्ट्रपती दौपदी मुर्मू आज संबोधित करणार**
- **इंडिया मेरीटाईम वीक परिषदेमध्ये जागतिक उद्योगांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी पंतप्रधान उद्या संवाद साधणार**
- **महाराष्ट्रासह चार राज्यांतील डाळी आणि तेलबियांच्या, १५ हजार कोटींपेक्षा जास्त खर्चाच्या खरेदी योजनेला केंद्राची मंजुरी**
- **बिहारसह देशभरांत छटपुजेचा उत्साह**
- **आणि**
- **मोथा चक्तिवादळाच्या पार्श्वभूमीवर आंध्रप्रदेशात अतिदक्षतेचा इशारा**

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार